संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

वर्ष : ६ वे ● ● अंक : १२२ ● ● शुक्रवार दि. २२ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली रमेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. रमेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफिद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

## चंद्रहार पाटलांना 'सांगली'ची उमेदवारी : उद्धव ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची जन संवाद सभा मिरजेत संपन्न झाली. या सभेत बोलताना पै.चंद्रहार पाटील यांना उमेदवारी देणार असल्याचे उद्धव ठाकरे यांनी जाहीर केले. या सभेत जाहीर केलेल्या उमेदवारीनंतर आता सांगलीच्या राजकारणाला नवे वळण मिळणार आहे.

महाविकासआघाडीच्या लोकसभेबाबतच्या जागा वाटप अद्यापही अंतिम झालेल्या नाहीत. मात्र या जागावाटपापूर्वीच मिरजेत शिवसेनेचा जनसंवाद मेळावा संपन्न झाला. या मेळाव्या दरम्यान डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून उमेदवारीवर शिक्कामोर्तब देखील झाले आहे. उद्धव ठाकरे यांनी सभे कार्यकर्त्यांना मार्गदर्शना करताना ही उमेदनारी जाहीर केली आहे.

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात कोल्हापूरच्या बदली सांगलीच्या जागेवर ठाकरे शिवसेनेने हक्क सांगत असताना पैलवान चंद्रहार पाटील यांची उमेदवारीही जाहीर केली आहे. या मेळाव्यासाठी महाविकास आघाडीतील मित्र पक्ष म्हणून काँग्रेस व राष्ट्रवादीलाही निमंत्रण देण्यात आले होते. लोकसभेच्या आखाड्यात उतरणार यावर चंद्रहार पाटील पहिल्यापासून ठाम आहेत. गेल्या वर्षभरापासून ते लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी करीत आहेत. बैलगाडा शर्यत, रक्तदान शिबिर महारॅली, गावोगावी



मिरज : येथील जनसंवाद सभेमध्ये बोलताना उद्धव ठाकरे

संपर्क अभियान राबवून त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा मनसुबा अगोदरच व्यक्त केला होता.

## वय वर्ष फक्त १०३ ..!

### छे . . ! छे . . ! मी घरून मतदान करणार नाही तर प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊनच मतदान करणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सुशिक्षित वर्गामध्ये मतदान करण्याविषयी फारशी रुची दिसून येत नाही. मात्र अशाही स्थितीत काहीजण प्रकाशाचा किरण बनतात. असाच एक किरण ...शिराळामध्ये आहे. नाव महादेव दंडगे (स्वातंत्र सैनिक) वय वर्ष फक्त १०३.

या वयात ही देशप्रेम .. कणखरता . . जिद्द या शब्दांनी ओतप्रोत भरलेल. एक समृद्ध, सफल आयुष्य. ही गोष्ट आहे एका देशप्रेमी मतदाराची. शिराळा मतदार संघ विधानसभेला सांगली जिल्ह्याशी तर लोकसभेला कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले मतदार संघाशी जोडलेला. या मतदारसंघाची पाहणी करण्यासाठी तेथील निवडणूक निर्णय अधिकारी संजय शिंदे हे गेले होते. सोबत शिराळ्याच्या तहसीलदार श्यामला खोत या ही सोबत होत्या.

यंदा निवडणूक आयोगाने ८५ वर्षांपुढील तसेच अंध मतदारासाठी



शिराळा : येथे महादेव दंडगे (स्वातंत्र सैनिक) वय वर्ष फक्त १०३ यांना मतदान उपक्रमाबाबत माहिती देताना शिराळा तहसीलदार श्यामला खोत व निवडणूक निर्णय अधिकारी संजय शिंदे

विशेष बाब म्हणून घरातूनच मतदान करण्याची सोय या निवडणुकीत केली आहे. निवडणूक आयोगाच्या या मतदान उपक्रमाबाबत माहिती सांगण्यासाठी श्री. शिंदे यांनी शिराळाचा दौरा केला. यावेळेस त्यांना या ठिकाणी श्री. दंडगे नावाचे स्वातंत्र्य सैनिक (वय -१०३ )असल्याचे समजले. त्यांची श्री. शिंदे यांनी आपुलकीने भेट घेत घरून मतदान करण्याबाबत सुचित केले.

त्यावर दंडगे यांनी स्मित हास्य करत सांगितले, छे . . ! छे . . ! मी घरून मतदान करणार नाही तर प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊनच त्या ठिकाणी मतदान करणार. त्यांची ही जिद्द पाहून निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शिंदे ही क्षणभरासाठी थबकले . . . ! जर या १०३ वर्षाच्या नवतरुण मतदाराचा आदर्श मतदानाकडे पाठ फिरविणाऱ्या नागरिकांनी घेतला तर?

## ईडीकडून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



अरविंद केजरीवाल

नवी दिल्ली : कथित मद्य घोटाळा प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यात आलेली आहे. ईडीने काल (दि. २१) रात्री उशिरा ही कारवाई केली आहे. दरम्यान केजरीवाल यांच्या निवासस्थानाबाहेर आंदोलन करणाऱ्या आप कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

रात्री उशीरा ईडीचे अधिकारी आणि मोठा पोलीस फौजफाटा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवास्थानाबाहेर पोहोचले. अनेक कार्यकर्ते केजरीवाल यांच्या निवास्थानाबाहेर होते. मात्र ईडीने आज त्यांना अटक करत मोठी कारवाई केली. या कारवाईनंतर कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे देखील पहायला मिळाले. त्यांच्या अटकेनंतर दरम्यान यावेळी आपचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे देखील पहायला मिळाले.

दिल्ली मद्य धोरण प्रकरणी अटकेपासून संरक्षण मिळावे, अशी मागणी करणारी याचिका दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी उच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर आज (दि.२१ मार्च) सुनावणी झाली. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाने अरविंद केजरीवाल यांना कठोर कारवाईपासून कोणतेही अंतरिम संरक्षण देण्यास नकार दिला. या टप्प्यावर आम्ही अंतरिम दिलासा देण्यास इच्छुक नसल्याचे न्यायालयाने सांगितले.

## लोकसभेसाठी काँग्रेसकडून सात जागांवर उमेदवार जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई/प्रतिनिधी : लोकसभा निवडणुकीकरता जागावाटपाचं काम अंतिम टप्प्यात आलं आहे दरम्यान, काँग्रेसने आज उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. त्यात महाराष्ट्रातून सात जणांना संधी देण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून काँग्रेसच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. पहिल्या यादीत ५७ जणांची यादी जाहीर केली असून यामध्ये महाराष्ट्रातील सात उमेदवारांची नावे आहेत. लातूर लोकसभा मतदारसंघातून डॉ. शिवाजीराव काळगे, सोलापूर लोकसभा मतदारसंघातून



छत्रपती शाहू महाराज

प्रणिती शिंदे, कोल्हापूर लोकसभा मतदारसंघातून छत्रपती शाहू महाराज, नंदूरबार लोकसभा मतदारसंघातून गोवल पाडवी, अमरावती लोकसभा मतदारसंघातून बळवंत वानखेडे, नांदेड लोकसभा मतदारसंघातून वसंतराव



रवींद्र धंगेकर

चव्हाण, पुणे लोकसभा मतदारसंघातून रविंद्र धंगेकर उमेदवारी देण्यात आली आहे.

## आटपाडीत शिक्षक समितीकडून नवगतांचे स्वागत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी पंचायत येथे प्राथमिक शिक्षक समितीकडून नव्याने रुजू झालेल्या कर्मचारी तसेच बढती मिळालेले अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार गटशिक्षणाधिकारी दतात्रय मोरे व विस्तार अधिकारी जगन्नाथ कोळपे यांच्या हस्ते करण्यात आला.

पंचायत समिती शिक्षण विभाग येथे नव्याने रुजू झालेले दत्तात्रय वाघमारे व शुभम पवार दोघांचा सत्कार करण्यात आला. तर इतर तालुक्यातून आलेले नवनियुक्त केंद्रप्रमुख आप्पासाहेब कबाडगे खरसुंडी, मीनाक्षी भगत करगणी, तुकाराम



आटपाडी : पंचायत समिती येथे नव्याने रुजू झालेल्यांचे स्वागत करताना गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय मोरे, यु.टी. जाधव व उपस्थित मान्यवर

कोकरे शेटफळे, विजया तारोळेकर आटपाडी, शिवाजी गळवे दिघंची या नवनियुक्त केंद्रप्रमुखांचा देखील स्वागत सत्कार करण्यात आला.

यावेळी शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु.टी.जाधव, जिल्हा कोषाध्यक्ष सचिन देठे, अध्यक्ष संजय कबीर, नेते श्याम ऐवळे, विभाग सचिव दीपक कुंभार, सरचिटणीस प्र.केंद्रप्रमुख प्रवीण बाड, एम.एड.कृती समितीचे सांगली जिल्हा अध्यक्ष अजय राक्षे, शिक्षक पतसंस्थेचे संचालक जनार्दन मोटे, संजय काळेल, दवाखान्याचे संचालक बाबासाहेब शेख, पांडुरंग ऐवळे, आनंद यादव, विषय तज्ञ स्मिता मोटे, आशा विभूते आदी उपस्थित होते.

## सहाय्यक सेवाभावी संस्था डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : सहाय्यक सेवाभावी संस्था खटाव ता. मिरज, जि. सांगली या संस्थेने सामाजिक बांधिलकी स्वीकारून २००५ पासून समाजातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, स्त्रियांना समाजामध्ये मान सन्मान मिळण्यासाठी, तरुण पिढी व्यसनमुक्त राहण्यासाठी, मागास व दुर्बल घटक यांना एकत्रित करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी काम केले आहे.

संस्थेच्या या कामाची दखल महाराष्ट्र शासनाने घेतल्याने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सन २०२२-२३ या वर्षाच्या पुरस्कारामध्ये सहाय्यक सेवाभावी संस्थेला डॉ.



मुंबई : येथे मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी

बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, आम. संजय सावकारे, सचिव सुमंत भांगे, आयुक्त ओमप्रकाश बकोरिया यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सदरचा हा सहाय्यक सेवाभावी संस्थेचे (अध्यक्ष) व तंबाखूमुक्त शाळेचे जिल्हा समन्वयक रवींद्र कांबळे, सचिव ज्योती राजमाने, सदस्य बबन कुंभार, पोपट कांबळे, महादेव कांबळे, मालन कांबळे यांनी स्वीकारला.

## डॉ. रोंगे सरांनी माळरानावर ज्ञानाचे नंदनवन फुलवले

### प्र-कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा : स्वेरी मध्ये पहिला पदवीदान समारंभ संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पंढरपूर : 'स्वेरीची वाटचाल पाहिली असता 'आधी पत्रा, नंतर 'आरसीसी' आणि आता एसी' अशी उपलब्धता झाली आहे. याचे खरे कारण म्हणजे डॉ. रोंगे सरांनी घेतलेले परिश्रम होय. तंत्रशिक्षणात नवनवे प्रयोग करून ते यशस्वी करून दाखवण्यासाठी जागवलेली तीव्र इच्छा, घेतलेले कठोर परिश्रम आणि त्याला मिळालेले अदभूत यश! हा प्रवास खरोखर कौतुकास्पद आहे. शैक्षणिक उपक्रमा बरोबरच कॅम्पसमध्ये निर्माण झालेले संशोधनाच्या वातावरणामुळे विद्यार्थ्यांच्या यशात भर पडत आहे. विद्यार्थ्यांनी करिअर करताना प्रयत्न करण्यापेक्षा ध्येय गाठण्याकडे अधिक लक्ष द्यावे. प्रयत्न हे कमी पडू शकतात पण ध्येय हे पूर्णत्वाला न्यावेच लागते. जसे की डॉ. रोंगे सरांनी स्वप्न पाहिले आणि या माळरानावर तंत्रशिक्षणाबरोबरच आता संशोधनाचे ज्ञानसंकुल उभे केले. त्यांनी केवळ प्रयत्नच केले नाहीत तर ध्येय पूर्ण केले. एकूणच डॉ. रोंगे सरांनी या माळरानावर ज्ञानाचे नंदनवन फुलवले आहे.' असे प्रतिपादन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व कॉलेज ऑफ फार्मसीच्या वतीने पहिला संस्थास्तरीय दीक्षांत समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्र.कुलगुरू डॉ.दामा हे बोलत होते. महाराष्ट्र गीत, विद्यापीठ गीत आणि स्वेरी गीतानंतर प्रास्ताविकात



स्वेरीमध्ये पहिल्या पदवीदान समारंभाचे उदघाटन करताना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरचे प्रभारी कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत यावेळी उपस्थित मान्यवर

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी. रोंगे यांनी १९९८ साली स्थापन झालेल्या स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगची आतापर्यंतची वाटचाल सांगून 'रोपट्याचे रूपांतर वटवृक्षात कसे झाले? याबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की 'स्वेरीमध्ये विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धती राबवताना विद्यार्थ्यांना करिअर करण्यासाठी न आवडणाऱ्या गोष्टीही कराव्या लागतात. केवळ परीक्षा वेळी अभ्यास करायचा' ही विद्यार्थ्यांची मानसिकता बदलुन 'सुरुवातीपासून अभ्यास करायचा' ही विद्यार्थ्यांमध्ये मानसिकता निर्माण केली. अभियंता सर्वजण बनतात परंतु याठिकाणी चांगल्या पद्धतीचा मानवी चेहरा देण्यासाठी कधीकधी मनाविरुद्ध कार्य करावेच लागते. याचा परिणाम म्हणजे अल्पावधीत स्वेरीचा स्वतंत्र 'ब्रँड' तयार झाला. आता स्वेरी ब्रँड हा केवळ शिक्षणापुरता न राहता संस्थेच्या नावात असलेला 'रिसर्च' हा शब्द खऱ्या अर्थाने सत्यात उतरवायचे ठरविले आणि त्या दिशेने वाटचाल सुरु आहे.' असे सांगून त्यांनी स्वेरीबाबतच्या विशेष नोंदी सांगितल्या.

पहिल्याच पदवीदान समारंभ प्रसंगी इमारतीच्या प्रवेशद्वारापासून ते आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉल पर्यंत ज्ञानदंड घेऊन ज्ञानदंडाची मिरवणूक काढण्यात आली. यामध्ये प्रभारी कुलगुरू यांच्यासह स्वेरीचे प्राचार्य, बी. फार्मसीचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, पदवीधर व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यावेळी गेट परीक्षेमध्ये उज्वल यश मिळविलेल्या दहा विद्यार्थ्यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार देखील करण्यात आला.

यावेळी डॉ. राजशेखर येळीकर, पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार, सोलापूर विद्यापीठ परीक्षा विभागाचे स्वेरीचे समन्वयक डॉ. सतीश लेंडवे, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी.मनियार, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, व विद्यार्थी उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रम विभागाचे प्रमुख डॉ. यशपाल खेडकर आणि डॉ. नीता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

#### सेल्फी पॉइंटला प्रचंड गर्दी

स्वेरीत पहिला दीक्षांत समारंभ पार पडला. कार्यक्रमाच्या समारोपानंतर स्वेरी कॅम्पसच्या मुख्य पोर्च समोर लावलेल्या आकर्षक सेल्फी पॉइंटवर स्वेरीचे माजी विद्यार्थी अर्थात पदवीधर तरुणाईने सेल्फी घेण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. हे मात्र विशेष लक्ष वेधून घेत होते. सेल्फी पॉइंटच्या आकर्षक फलकावर विद्यापीठाचे चिन्ह, स्वेरी चिन्ह, एनबीए मानांकन, स्वेरीच्या रौप्य महोत्सवी वषाचे चिन्ह,नॅकचे 'अ प्लस' मानांकन लावले होते. या पॉइंटवर काढलेला सेल्फी छायाचित्र पदवीधर कायमचे जतन करणार हे मात्र निश्चित.

## * संपादकीय *

# डबे प्रवासी की..

प्रवासाची वेळ जवळ आली की रेल्वेच्या यार्डात बराच काळ उभे करून ठेवलेले डबे एकमेकांना जोडण्याचे काम सुरू केले जाते. निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील सध्याचे राजकीय चित्र हे असे रेल्वे स्थानकाचे स्मरण करून देणारे आहे. रेल्वे स्थानक आणि हे राजकीय चित्र यातील एक साम्य आणि एक फरक तेवढा नमूद करायला हवा. साम्य असे की रेल्वेच्या यार्डात बराच काळ दुर्लक्षित राहिलेल्या डब्यांप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक राजकीय पक्षांस स्वत:स कोणत्या 'इंजिना'स जोडून घ्यावयाचे हे ठरवण्याचा अधिकार नाही. यातील एका गाडीचे दोन चालक दिल्ली-स्थित असून ईडी-पिडी, केंद्रीय गुन्हा अन्वेषण यंत्रणा आदी 'रिमोट कंट्रोलां'च्या साहाय्याने यातील अनेक डबे एकाच भगव्या रंगाच्या गाडीस कसे जोडले जातील; याचे अव्याहत प्रयत्न त्यांच्याकडून सुरू आहेत. ही गाडी अतिजलद मानली जाते आणि तिच्या चालकांचे सामर्थ्य लक्षात घेता तिला अखंड 'हिरवा कंदील' मिळत राहील याचीही व्यवस्था आहे असे म्हणतात. फरकाचा मुद्दा असलेली दुसरी गाडी सामान्य 'पासिंजर' असून तिचे चालक आपल्या गाडीस कोणता रंग द्यावा याच विचारात गर्क दिसतात. तसेच या गाडीस नक्की कोणते डबे लागले जाणार, किती लागणार आणि मुख्य म्हणजे या गाडीचे इंजिन कोणते आणि त्याची दिशा कोणती या प्रश्नांची उत्तरेही शोधण्याचा प्रयत्न सुरू आहे. शक्यता ही की पहिल्या अतिजलद गाडीने नाकारलेले अथवा सोडून दिलेले काही डबे स्वत:स या दुसऱ्या 'पासिंजर' गाडीस जोडले जातील. असो. रेल्वे यार्डातले डबे आणि राजकीय पक्ष यांतील रूपक येथे संपते. ते गंमत म्हणून ठीक. पण त्यानंतर या पक्षांच्या राजकीय अपरिहार्यतेचा विचार पुरेशा गांभीर्याने करायला हवा. कारण यातील राजकीय पक्षांचा संघर्ष आगामी निवडणुकांतील गांभीर्य दाखवून देतो.

या संघर्षाच्या एका बाजूस आहे 'चारसो पार'चा दावा करून स्वत:च स्वत:च्या पिंजऱ्यात अडकलेला भाजप. या पक्षाचा महाराष्ट्रापुरता विचार केल्यास गेल्या निवडणुकांप्रमाणे राज्यातील ४८ जागांतील ४२ जागांची आशा बाळगणे त्या पक्षास दिवसेंदिवस अवघड वाटू लागले आहे. एके काळचा जोडीदार असलेल्या शिवसेनेस धडा शिकवण्याच्या ऊर्मीतून भाजपने शिवसेना फोडली खरी. पण त्यामुळे तयार झालेले विवर भरून काढण्यासाठी त्या पक्षास काय काय करावे लागत आहे हे पाहिल्यावर त्या पक्षाची आणि विवर भरून काढण्यासाठी त्यात उडी घेऊ इच्छिणाऱ्या पक्षांची अगतिकता लक्षात यावी. एकनाथ शिंदे आणि कंपूतील खुद्द शिंदे आणि एखाद-दुसरा सोडल्यास बाकीच्या राजकीय उडाणटप्पूंस स्वीकारण्यास भाजप तयार नाही. यातील बऱ्याच गणंगांविरोधात भाजपत मोठी अंतर्गत नाराजी असून त्याचा फटका भाजपच्या अंकगणितांस बसणार नाही; असे अजिबात नाही. उलट या सगळ्या गटातटांतील तणाव लक्षात घेता तो बसणार हे निश्चित. ठाकरे यांच्या गटातील १३ खासदार शिंदे यांच्यासमवेत आहेत. त्या सर्वांस उमेदवारी देणे म्हणजे भाजपने स्वत:च्या पायावर धोंडा मारून घेणे. तो पक्ष असे काही आततायी कृत्य करणे अशक्य. तितकी दुर्दैवी परिस्थिती भाजपवर आलेली नाही. पण या गणंगगंपूंस हाताळताना ती लवकरच येईल. खेरीज भाजपच्या 'गरज सरो, वैद्य मरो' या वृत्तीमुळे उमेदवारी नाकारली गेलेले भिन्नपक्षीय अन्य उमेदवारांचे 'दिल से' स्वागत करतील याची सुतराम शक्यता नाही. ते राणा दाम्पत्य काय किंवा काही राजघराण्यांचे वंशज काय! दिल्लीश्वरांच्या हट्टापायी काय काय पात्रांस जवळ करण्याची वेळ भाजपने स्वत:वर आणली हे पाहून त्या पक्षाच्या स्थानिक नेतृत्वाची कीव यावी.

आणि आता हे सर्व कमी पडतात म्हणून की काय राज ठाकरे यांच्या मनसेचे 'इंजिन' भाजप मागच्या बाजूने आपल्या गाडीस जोडताना दिसतो. अन्य काही पक्षीय डब्यांप्रमाणे हे इंजिनही बराच काळ यार्डात होते. त्यामुळे त्यास गती देण्यात काही काळ जाईल. या मनसेच्या इंजिनास भाजपच्या गाडीस ढकलण्यात जितका रस आहे त्यापेक्षा अन्य गाड्यांची 'तुतारी' बुजवण्याची आणि 'मशाल' विझवण्याची अधिक निकड आहे. अलीकडच्या काळातील स्थितीवादामुळे हे इंजिन स्वत:हून धावू शकत नाही, असे चित्र निर्माण झाले आहे. आताही ते किती ताकदीने धावेल हा प्रश्न आहेच. पण रेल्वे गाडी घाटातून जाताना मागे इंजिन असण्याची म्हणून एक उपयुक्तता असते. त्याचा विचार करून भाजपस हे मनसे इंजिन आपल्या गाडीस जोडून घेण्यात स्वारस्य असणार. राजकारणात असे प्रसंग येतात. पण त्यामुळे भाजपची घाट-कोंडी झाल्याचा संदेश राजकीय वातावरणात पसरत असून ठाकरे नावाच्या इंजिनाच्या मदतीशिवाय दुस्तर हा घाट ओलांडणे त्यास शक्य नाही, असे दिसते.

दुसरीकडे काँग्रेस, उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवार यांस कोठे जायचे आहे हे ठाऊक आहे; पण मार्गाबाबतचा त्यांच्यातील गोंधळ लपवणे अवघड होत असावे. मुंबईत ठाकरे यांच्या शिवसेनेस सहानुभूती आहे; पण तिचा सुयोग्य वापर करण्यासाठी उमेदवारांची वानवा! जे नेते अजून त्यांच्यासमवेत आहेत त्यांच्याबाबत ''आत्ता होते; गेले कुठे'' असा प्रश्न कधी विचारावा लागेल हे सांगता येत नाही अशी स्थिती. शरद पवारांच्या राष्ट्रवादीस सुप्रिया सुळे यांच्या बारामतीचा घोर लागलेला आणि उरलेला वेळ अजितदादांकडील नाराज गळास लावण्यात चाललेला. काँग्रेसची अवस्था याहून बिकट. उरल्या-सुरल्या पांघरुणात पाय झाकावयास जावे तर डोके उघडे पडते आणि ते डोक्यावर ओढून घ्यावे तर पाय पांघरुणाबाहेर. असा हा पेच. या सगळ्याच्या जोडीला आपल्या भुणभुणीने सतत झोपमोड करणाऱ्यांसारखी वंचित आघाडी. वास्तविक प्रकाश आंबेडकर डावीकडे पाहत उजवा रस्ता कसे निवडतात हे जगास माहीत. आपण तन-मनाने भाजपविरोधात आहोत, असे ते दाखवतात. पण प्रश्न तन-मनाचा नसतो. त्यानंतरच्या 'न'चा असतो हे समस्त राजकीय वर्तुळातील उघड गुपित. तेव्हा त्यांना हाताळण्याचा अनुभव 'ओला', 'उबर' टॅक्सी सेवेचे स्मरण करणारा ठरतो. या टॅक्सीचालकांस जेव्हा आपणासाठी यावयाचे नसते; तेव्हा ते येत नाहीतच पण तरी भाडे रद्द करण्याचे पाप आणि भुर्दंड मात्र ते आपल्या गळ्यात घालू पाहतात. त्याप्रमाणे प्रकाश आंबेडकर यांस भाजपविरोधात 'इंडिया' आघाडीचा घटक होण्याची 'आतून' इच्छा नाही, पण आपण युतीस तयार नाही असेही त्यांस दाखवावयाचे नाही. हा दुसरा पेच.

त्यातून विरोधक कसा मार्ग काढतात हे पाहणे महाराष्ट्राचे राजकीय उद्बोधन करणारे ठरेल, यात शंका नाही. हा या राज्यातील राजकारणाने गाठलेला नवा तळ. इतके दिवस काही एक राजकीय विचार, तात्त्विकादी मतभेद राजकीय फाटाफुटीमागील कारण ठरत. आता तो काळ इतिहासजमा झाला. आजचा काळ उद्याचे वा परवाचे राजकारण पाहण्याचा नाही. तर आजचे आणि त्यातही आताचे काय ते बोला, यावर आपले राजकारण येऊन ठेपलेले आहे. म्हणून आजच्या राजकारणास रेल्वे स्थानक आणि यार्डातील डब्यांची उपमा चपखल ठरावी. निवडणुकांच्या हंगामात या दोन्ही रेल्वे गाड्या आता धावू लागतील. तथापि या रेल्वे गाड्यांतील किती डब्यांत 'प्रवासी' आहेत आणि किती डबे प्रत्यक्षात मालगाडीचे- त्यातही रिकामे- आहेत इतके कळणे फक्त आता बाकी.

# जपा कोवळ्या मनांना!



आपल्या कुटुंबातील लहान मुलांना जशी काळजी, संरक्षणासोबत मायेची, भावनिक ओलाव्याची गरज असते, तशीच ती बालगृहातील मुलांनाही असते. तेथील कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यासह इतर सोयीसुविधा अद्ययावत करण्यावर आता सरकारचा भर आहे, हे स्वागतार्हच. मात्र, या सुविधा हे मुलांचे हक्क आहेत, व त्या पुरवणे हे व्यवस्थेचे कर्तव्य. या कोवळ्या मनांना जपण्यासाठीची संवेदनशीलता सगळ्यांमध्येच हवी.

बालगृहे म्हणजे नेमके काय? मुलांच्या प्रेमाने संगोपनाची जागा, की मुलांना डांबून ठेवणारा तुरुंग? गेल्या काही वर्षांत बालगृहासंदर्भात येणाऱ्या तक्रारी सातत्याने वाढत्या आहेत. तेथील शोषण, जाचाला कंटाळून पळून जाणारी मुले, आत्महत्या करणारी बालके, सहनशीलता संपल्यावर बालकांकडूनही बालगृहांच्या कर्मचाऱ्यांना होणारी मारहाण आणि अपुरे मनुष्यबळ... तक्रारींचा हा पाढा वाढता आहे. या जागा मुलांना ओरबाडणाऱ्या नव्हे, तर जपणाऱ्या हव्यात हे ओळखून सरकारने आता बालगृहांच्या अंतर्गत रचनेपासून समुपदेशनाच्या सुविधांपर्यंत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या मुलांना बालगृहात ठेवण्यात येते. गुन्हेगारी कृत्यांत अडकलेल्या मुलांना प्रौढ गुन्हेगारांप्रमाणे तुरुंगात ठेवू नये, यासाठी त्यांना निरीक्षणगृहात ठेवले जाते. त्यांचा कायदेशीर संघर्ष सुरू असल्याने त्यांना विधिसंघर्षग्रस्त म्हणावे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी जे जे करता येईल ते ते सर्व करावे, हा बालगृह, निरीक्षणगृहांच्या निर्मितीमागील मूळ हेतू.

मुले ही कायम 'सॉफ्ट टार्गेट' असतात. एकाकी अशा या मुलांना अन्यायाविरुद्ध तक्रार करणे, शोषणाविरुद्ध दाद मागणे हे तसे कठीणच असते. हे पक्के ठाऊक असल्यामुळे काही बालगृहे किंवा निरीक्षणगृहे ही अत्याचाराची केंद्रे बनली. अशा कोंडवाड्यामधून पळून जाणाऱ्या मुलांच्या विदारक कहाण्या ऐकू येऊ लागल्या. ही मुले ऐकतच नाहीत, हिंसक होतात, मुले बादच आहेत... अशा तक्रारींचा जोरही वाढता होता. मग, ही अशी परिस्थिती का निर्माण होते, यावर विचार सुरू झाला. अशा मुलांची एक बालगृहातून दुसऱ्या बालगृहात बदली केल्याने काय साध्य होते, यावरही चर्चा सुरू झाली.

गेल्या अनेक वर्षांत बालगृहांच्या अंतर्गत व्यवस्थेचा अभ्यासच न झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात कडक ताशेरे ओढले होते. बालगृहांचे प्रश्न केवळ समिती स्थापन करून सुटणार नाहीत, तर मुलांच्या हक्क-अधिकारासंदर्भात कोणत्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहायला हवे हा कळीचा मुद्दा आहे. आत्तापर्यंत अपुरे कर्मचारी, सुविधांची अपुरी उपलब्धता हे मुद्दे घेऊन बालगृहाच्या संदर्भात सातत्याने चर्चा होत आली. मात्र मुलांच्या सुरक्षिततेसंदर्भात राबवण्यात येणाऱ्या मार्गदर्शक धोरणाच्या संदर्भात गांभीर्याने विचार झाला नाही.

मुंबईतील बालगृहांमधील, तसेच त्याच्याशी संलग्न संस्थामधील कारभार हा महाराष्ट्रातील अन्य बालगृहांच्या तुलनेत समाधानकारक आहे. राज्यात इतर ठिकाणी मात्र ही परिस्थिती समाधानकारक नाही. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र तसेच उत्तर महाराष्ट्रात मागील काही वर्षांत अनुदानित बालगृहांची संख्या वाढली आहे. मुले नाहीत; पण बालगृहे आहेत, मुलांच्या नोंदी होतात, अनुदान निघते असेही प्रकार वाढीस लागले आहेत. कोणत्याही बालकास बालगृहामध्ये दाखल करणे हा अंतिम पर्याय असला पाहिजे, असे कायदा सांगतो. त्यासाठी शासनाकडून वारंवार परिपत्रके देखील निघाली आहेत. बाल कल्याण समितीच्या कामाचे त्यासाठी सातत्याने निरीक्षण देखील करण्यात येते व प्रसंगी जाब विचारला जातो. पण दुसऱ्या बाजूने अनेक बालगृहांना परवानग्या कशा काय द्याव्या लागतात, हे गूढच आहे.

कोणतेही मूल हे बालगृहापेक्षा कुटुंबामध्येच राहावे, तिथे त्याला सुरक्षित व चांगला भोवताल मिळावा ही भूमिका कायम असायला हवी; मात्र गेल्या काही वर्षांत राजकीय कार्यकर्त्यांचे 'पुनर्वसन' करण्यासाठी काही संस्थाच्या बालगृहांना मान्यता देण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यात अशी किती बालके आहेत, त्यांच्यासाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, याची शहानिशा न करता प्रत्येक मुलामागे दोन हजार रुपये या हिशेबाने लाखो रुपये अनुदान ओढण्यात आले. काही जिल्ह्यांमध्ये तर मुलींसाठी बालगृहेच नाहीत. काही जिल्ह्यांमध्ये मातेपासून दूर झालेल्या किंवा केलेल्या तान्ह्या बाळांना ठेवण्यासाठी शिशुगृहेच नाहीत. कित्येक किलोमीटरचा प्रवास करून अशा बाळांना दुसऱ्या जिल्ह्यात न्यावे लागते, किंवा त्यांना शहरात आणले जाते.

एका बाजूला गल्लाभरू बालगृहे मुलांना दीर्घकाळ ठेवून घेण्यासाठी आग्रही असतात. राजकीय वरदहस्त असलेल्या काही संस्थांनी मुलांना मोकळे केलेले नाही, हे कटू वास्तव आहे; तर दुसऱ्या बाजूला बालकांना कुटुंब मिळावे म्हणून प्रयत्न करणारे अधिकारी आणि कर्मचारी देखील आहेत. मात्र, अनेक दबावांमुळे कोणत्याही मूलभूत सुविधांशिवायच अशा बालकांना त्यांना बालगृहातच ठेवून घ्यावे लागत आहे.

मनुष्यबळाची अडचण सोडवण्यासाठी कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या नेमणुकांमध्ये वीस-बावीस वर्षाच्या अधीक्षक, निरीक्षकांच्या जागा भरल्या जातात. मुलांच्या संदर्भातील कामाचा अनुभव नाही, प्रश्नांची जाण नाही, अशा या तरुण अधिकाऱ्यांकडून चुका झाल्या की त्यांना डच्चू दिला जातो. पुन्हा त्या जागा रिक्त राहतात. मुंबईतील काही बालगृहांचे व्यवस्थापन दाद देण्यासारखे आहे. येथे कार्यकर्ते,अधीक्षक मुलांसाठी जीव तोडून काम करतात. तिथे राहिलेल्या व पुढे आयुष्यात यशस्वी झालेल्या मुलांच्या कथा सामान्यांपुढे याव्यात यासाठी धडपडतात. अपुरे मनुष्यबळ, उशिरा मिळणारे अनुदान, तांत्रिक अडचणी यांमुळे त्यांचे हे प्रयत्न तोकडे पडतात. या बालगृहांची जबाबदारी महिला बालकल्याण विभागाची, की सामाजिक न्यायविभागाची या झगड्यामध्येही अनेक प्रश्नांचे घोंगडे भिजत पडते. अपुरे मनुष्यबळ, बालगृहांतील मुलांच्या नोंदी ठेवण्यातील अडचणी या बाबी लक्षात घेऊन आता बालगृहांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्याची प्रक्रिया सुरू आहे. मुंबईसह राज्यातील बालगृहांमध्ये असलेल्या मुलांची माहिती एकाच पोर्टलवर आणण्यासाठी प्रयत्न होत आहेत. या पोर्टलवर मुलांच्या नोंदी करण्यात आल्यानंतर विविध प्रकारच्या योजनांचे लाभ किती मुलांना मिळतात, बालगृहातून एका वर्षाच्या आत किती मुले पुन्हा कुटुंबामध्ये गेली याचीही नोंद ठेवणे त्यायोगे सोपे होईल. करोना काळामध्ये ज्या अनाथ मुलांचे पालकत्व नातलगांनी वा कुटुंबातील इतर सदस्यांनी घेतले, त्यासंदर्भातील माहितीचे दस्तावेजीकरणही या नव्या प्रक्रियेमुळे करण्याचा सरकारचा विचार आहे. मुलांना वेगवेगळ्या प्रकारच्या गैरकृत्यांमध्ये अडकवणे, त्यांचा गैरफायदा घेणे, असे प्रकार सर्रास घडतात. नशेच्या आहारी गेलेल्या मुलांच्या व्यसनमुक्तीसाठी डोंगरी येथे पहिले बालव्यसनमुक्ती केंद्र सुरू करण्यात आले. हा निर्णय स्वागतार्ह असला तरीही तो संस्थांच्या पुढाकाराने किंवा पाठिंब्याने राबवला जातो. हे उपक्रम राबवणे ही खासगी संस्थांची नव्हे, तर सरकारची जबाबदारी असायला हवी.

नव्या बदलांनुसार, खासगी वा सरकारी बालगृहांत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासह बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. त्यास अंतर्गत विरोध होत आहे. मात्र, निर्णयाच्या अंमलबजावणीवर सरकार ठाम व आग्रही आहे. बालहक्क व अधिकारांच्या संदर्भात संवेदनशील असलेल्या संस्थानाही मुलांची जबाबदारी विभागून देण्याच्या दृष्टीने विचार सुरू आहे. शिक्षणाचा हक्क हा सर्वसामान्य मुलांप्रमाणे बालगृहातील मुलांनाही आहे, हा विचार केंद्रस्थानी येत आहे.

मुलांना संस्थेतून बाहेर काढून त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी काही धोरणात्मक निर्णयांची आज गरज आहे. पुनर्वसन पत्रिकेच्या नमुना क्रमांक ७, १४ आणि ४५ यानुसार नोंदी ठेवायला हव्यात. या फॉर्ममधील नमुना क्रमांक सातमध्ये प्रत्येक महिन्याला बालगृहातील मुलांची काळजी कशी घेतली जाते, याची माहिती भरणे अपेक्षित असते. तर, नमुना क्रमांक चौदामध्ये पुनर्वसन प्रक्रियेत मूल बालगृहामध्ये येऊ नये, यासाठी कोणते प्रयत्न करायला हवेत, याची स्पष्टता हवी. आजही अनेक ठिकाणी या नोंदी ठेवल्या जात नाहीत. सर्वसामान्य कुटुंबातल्या मुलांच्या नैसर्गिक, भावनिक गरजांची पूर्ती करण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. त्या मुलांना कुटुंबामध्ये मायेचा ओलावा मिळत. तशीच वागणूक बालगृहातील मुलांनाही मिळायला हवी. बालगृहांमधील मुलांचा सांभाळ करण्याबद्दलचे बालसंरक्षणधोरण लागू असायला हवे. मात्र, सरकारचे बालसंरक्षणधोरण अजूनही कागदावर असल्यामुळे ते संस्थांना कोणत्या हक्काने जाब विचारणार ? या मुलांचे प्रश्न समजून न घेतल्याने ती प्रसंगी हिंसक होतात, बिथरतात. त्यांच्याशी दमदाटी करूनच वागवायला हवे, असा एक नकारात्मक सूर सातत्याने ऐकू येतो. या मुलांशी संवाद साधण्यासाठी जे अधिकारी संस्थेत असायला हवेत ते तिथे नसतात; त्यामुळे मुलांच्या मनातले प्रश्न ओठांबाहेर येत नाहीत. त्यांची घुसमट होते. कोणत्याही व्यवस्थेत मूल पळून जाणे, त्यांचा मृत्यू होणे हे समाज म्हणून आपले अपयशच. बालगृहांसंदर्भात एकमेकांमध्ये गुंतलेले प्रश्न समजून घेणे गरजेचे आहे. ते समजून घेतले तरच बालगृहांचे काही प्रश्न सुटण्यासाठी तरी निश्चितपणे मदत होईल.



## राजारामनगर येथे स्व. बापूंच्या पुतळ्यास अभिवादन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इस्लामपूर: बहे ता. वाळवा येथील नूतन उपसरपंच अधिक मोहिते यांनी राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरती लोकनेते बापूंच्या पूतळ्यास पुष्पहार अर्पण करुन आभिवादन केले. कारखान्यांचे उपाध्यक्ष व वाळवा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष विजयराव पाटील, वाळवा तालुका युवकचे अध्यक्ष संग्राम जाधव यांनी सर्वाचे स्वागत केले. कारखान्यांचे माजी संचालक माणिकराव दादा पाटील, माजी उपसरपंच मनोज पाटील, सरपंच संतोष दमामे, माजी उपसरपंच हणमंत पाटील, अजित थोरात, बी.जी. पाटील, हणमंत पाटील, शशिकांत पाटील, दिलीप देशमुख, कालिदास पाटील, जालिंदर थोरात, विनायक पाटील, संदीप थोरात, विजयसिंह पाटील, धनंजय थोरात ,कुमार सावंत, अधिक दमामे, शकुंतला थोरात, धनश्री थोरात, मनीषा सुतार, प्रशांत थोरात, संभाजी मोहिते, अमोल थोरात, कबीर पाकजादे, भगवान गुजर यांच्या सहकार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

## कुरूंदवाड येथे माऊली महिला संस्थेमार्फत महिलांचा आनंद आणि सन्मान वाढविणारा कार्यक्रम संपन्न


**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कुरूंदवाड: महिलांच्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर राहून महिलांची माऊली म्हणून ओळख असलेल्या शिरोळ तालुक्यातील कुरुंदवाड येथील माऊली महिला संस्थेच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रविवार दिनांक १७ मार्च रोजी महिलांचा आनंद आणि सन्मान वाढवणारा कार्यक्रमाचे सामाजिक युवा कार्यकर्ते अरुण काशिनाथ नाईक यांच्या सहकार्यातुन आयोजन करण्यात आले. सध्या परीक्षेचे दिवस असल्यामुळे ५ ते ९ वी पर्यतच्या सर्व मुलींच्यासाठी सुंदर हास्ताक्षर स्पर्धा आयोजित करून मुलींना अभ्यासाचे महत्त्व पटवून दिले तसेच महिलांच्यासाठी विविध कार्यक्रम फनीगेम्स घेऊन महिलांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण केला यावेळी हास्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक कुमारी जिया आफसर पट्टेकरी दुतीय क्रमांक कुमारी ऋतुजा रमेश मालवेकर तर तुतीय क्रमांक कुमारी सई अमोल जाधव यांनी बक्षिसे मिळवली तर महिला स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ ज्योती शशांक मालवेकर ,दुतीय क्रमांक सौ पूजा शिरोळे तर तृतीय क्रमांक कुमारी दिपाली मारुती कानडे यांनी मिळवला विजेत्या सर्व स्पर्धेकांना प्रमुख पाहुणे संग्राम दूध संस्थेचे अध्यक्ष प्रदीप भोई सौ भाग्यश्री प्रदीप भोई आणि जिल्हा बँकेचे कॅशीयर रवींद्र कारंजकर यांच्या हास्ते बक्षीस वितरण करण्यात आले यावेळी कार्यक्रमाचे स्वागत संचालिका शितल महाडीक यांनी तर प्रस्तावित संचालीका कुमारी रुपाली कानडे यांनी केले. पाहुण्याचा सत्कार संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री आडसुळ, उपाध्यक्षा वैशाली कुरणे, संचालिका दीपाली कांबळे, पूजा कारंजकर, वैशाली गायकवाड आरती आडसूळ यांनी केले शेवटी आभार संस्थेच्या सचिव सौ सुजाता जाधव तर सूत्र संचालन संचालिका मंदा कानडे यांनी केले यावेळी संस्थेच्या संचालिका सौ दिपा सावंत, सौ अनुजा सांळूखे यांच्या सह महिला उपस्थित होत्या.

## आचारसंहितेचे उल्लंघन होतेय ? मग, सीव्हिजिल ॲपवर तक्रार करा

### पहिल्या १०० मिनिटाच्या आत मिळतो प्रतिसाद

### भारत निवडणूक आयोगाने विकसित केला मोबाईल



भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर केल्या आहेत. या निवडणुका एकूण सात टप्प्यात होणार असून त्यासाठी मागच्या शनिवारपासून देशभरात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणूक कालावधीत आचारसंहितेचे उल्लंघन होत असल्यास सर्वसामान्य मतदार नागरिकांना आता थेट निवडणूक आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल सिटीझन प विकसित केले आहे. या पवर दाखल होणाऱ्या तक्रारींवर पहिल्या १०० मिनिटांत पहिली कार्यवाही केली जात आहे.

आचारसंहिता कालावधीत काय करावे आणि काय करु नये याविषयी निवडणूक उमेदवार, प्रशासन आणि राजकीय पक्षांना माहिती दिली जाते. पण, काहीवेळेला या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होते. त्याची तक्रार करणे आता पूर्वीपेक्षा अधिक सुलभ झाले आहे. आचारसंहिता उल्लंघनाची तक्रार किंवा माहिती निवडणूक आयोग आणि जिल्हा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सीव्हिजिल प विकसित केले आहे. या मोबाईल पद्वारे मतदारांना आता थेट आयोगाकडे तक्रार करता येणार आहे. या सीव्हिजिल पवर तक्रार प्राप्त होताच तातडीने त्यावर कारवाई केली जाते. तक्रारदाराचे नाव गोपनीय ठेवले जाते.

हा सीव्हिजिल प अँड्रॉइड आणि आयओएस डिव्हाइसवर डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहे. उल्लंघनाची तक्रार करण्यासाठी, वापरकर्त्यांनी फक्त प उघडणे, उल्लंघनाचा प्रकार निवडणे आणि घटनेचे तपशिल, स्थान, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओ प्रदान करणे आवश्यक आहे. प वापरकर्त्यांना त्यांच्या तक्रारींच्या प्रगतीचा मागोवा घेता येणार आहे.

**वैशिष्ट्य**

सीव्हिजिल प हा वापरकर्त्यांना आदर्श आचारसंहिताच्या उल्लंघनाची तक्रार करण्याची अनुमती देतो. नागरिकांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देतो. उल्लंघनाचे स्थान ट्रॅक करण्यासाठी जीपीएस वापरतो. वापरकर्त्यांना केवळ थेट घटना चित्रित करण्याची अनुमती देतो. तक्रारीच्या प्रगतीचा मागोवा घेतो.

**वापर कसा करायचा**

एन्ड्रॉईड मोबाईलमधील गुगल प्ले स्टोर आणि आयफोनमधील प स्टोर या पमध्ये जावून सीव्हिजिल (लतखक्ष्खङ) सर्च करावे.त्यानंतर प डाऊनलोड करा. त्यानंतर प उघडून मोबाईल क्रमांक, पत्ता, मतदारसंघ समाविष्ट करुन खाते तयार करा. तुम्हाला ज्या उल्लंघनाची तक्रार करायची आहे ते निवडा आणि स्थळ, वेळ आणि छायाचित्रे किंवा व्हिडिओंसह घटनेचे तपशील टाका. त्यानंतर तक्रार सबमिट करा.

**अचूक कृती व देखरेख**

या प्लिकेशनचा वापर करून, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयात न जाताही काही मिनिटांतच नागरिक राजकीय गैरव्यवहाराच्या घटनांची तक्रार नोंदवू शकतात. हा सीव्हिजिल प जिल्हा नियंत्रण कक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी आणि भरारी पथकाशी जागरूक नागरिकांना जोडतो. ज्यामुळे एक जलद आणि अचूक कृती, देखरेख आणि अहवाल प्रणाली तयार होते.

**लाईव्ह फोटो, व्हिडिओ**

या पच्या अचूकतेसाठी पमधून फक्त लाईव्ह लोकेशनवर आधारित फोटो, व्हिडिओ घेतले जातात. जेणेकरुन भरारी पथक, स्थिर संनिरीक्षण चमुंना वेळेत कार्यवाही करणे शक्य होईल.

**तातडीने होते कारवाई**

या पवर तक्रार दाखल होताच भारत निवडणूक आयोग तुमच्या तक्रारीची चौकशी करेल आणि योग्य ती कार्रवाई करेल.

**डाटा सुरक्षा**

या पवरील डाटा हा सुरक्षित ठेवला जातो. हा डाटा इतर कोणत्याही थर्ड पार्टीला दिला जात नाही. याशिवाय हा डाटा एन्ड टू एन्ड इन्क्रिप्टेड ठेवला जातो.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# बेपत्ता झालेल्या महिला, मुलींचा शोध तत्काळ घ्या: आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: गेल्या काही दिवसांपासून सातारा जिल्ह्यामध्ये मुली किंवा महिला बेपत्ता होण्याच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालेली पहायला मिळत आहे. वृत्तपत्रांमध्ये दररोज मुली अथवा महिला बेपत्ता झाल्याच्या बातम्या येत असतात. मिळालेल्या महितीनुसार आज अखेर आपल्या सातारा जिल्ह्यामधून सुमारे १४०० मुली, महिला बेपत्ता झाल्या असल्याचे समजत आहे. ही बाब अतिशय गंभीर आणि चिंताजनक आहे. बेपत्ता महिला, मुलींच्या सुरक्षिततेसाठी त्यांचा तत्काळ शोध घ्यावा, असे आवाहन आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पोलीस अधीक्षक समीर शेख यांना केले आहे.

यासंदर्भात आ. शिवेंद्रसिंहराजेंनी पोलीस अधीक्षक शेख यांना निवेदन दिले आहे. मुली, महिला बेपत्ता होणे यामुळे संबंधितांचे आई- वडील, कुटुंब, नातेवाईक यांच्यासह समाजमानवर त्याचे विपरीत परिणाम होत असतात. यामुळे महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून महिलांच्या सुरक्षिततेसाठी ठोस पावले उचलली गेली पाहिजेत. काही दिवसांपूर्वी किल्ले अजिंक्यतारा परिसरात एका मुलीचा मृतदेह सडलेल्या अवस्थेत मिळून आला होता. सदर मुलगी सुध्दा २ महिन्यांपासून बेपत्ता होती, अशी माहिती वृत्तपत्रांमध्ये छापून आली होती. दोन महिने बेपत्ता असलेल्या मुलीचा मृतदेह सापडतो पण, तिचा शोध लागत नाही ही बाब गंभीर आहे.

बेपत्ता मुली अथवा महिलांची नोंद त्या- त्या पोलीस ठाण्यामध्ये होत असते मात्र त्यांचा शोध का लागत नाही? संबंधीत मुली, महिलांचा शोध तत्काळ लागल्यास त्यांचा जीव वाचू शकतो अथवा पुढील अनर्थ, अनुचित प्रकार टाळला जाऊ शकतो. त्यामुळे बेपत्ता मुली अथवा महिला यांचा शोध लावणे यासाठी पाठपुरावा करणे हे काम संबंधीत पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचे आहे. याबाबत संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना द्याव्यात. बेपत्ता झालेल्या मुली, महिलांचा तत्काळ शोध घेण्यात यावा आणि मुली, महिला बेपत्ता होणे अशा घटनांना आळा बसणेसाठी ठोस उपाययोजना कराव्यात, असे आ. शिवेंद्रसिंहराजेंनी पोलीस अधीक्षक शेख याना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# पारधी जमातीच्या मुलांमुलीना आवर्जून शिक्षण देण्याची गरज: शेडगे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सातारा: पारधी समाजातील विद्यार्थी व विद्यार्थिनींचे शिक्षणातील गळतीचे प्रमाण अधिक असून समाजातील विचारी व्यक्तींनी, कोलेजच्या विद्यार्थी विद्यार्थिनी, तसेच विचारी महिलांनी या पारधी वस्तीतील मुलामुलीना वस्तीवर जाऊन आवर्जून शिक्षण देण्याची गरज आहे' असे प्रतिपादन लोकसेवा परिवार सामाजिक संस्थेचे संचालक ,व पारधी समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी काम करणारे सामाजिक कार्यकर्ते माणिककाका शेडगे यांनी व्यक्त केले. ते येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये 'पारधी संस्कृती व शिक्षण जागृती' या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. छ. शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागाने लोकसेवा परिवार सामाजिक संस्था



अंगापूर या संस्थेच्या सहयोगाने शिवाजी विद्यापीठ अग्रणी कॉलेज योजनेच्या अंतर्गत एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ.सुभाष वाघमारे , विशाल जाधव , साक्षी साळुंखे, भाग्यवान घाडगे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

माणिक काका शेडगे पुढे म्हणाले की 'पारधी समाज प्रामाणिक आहे .पूर्वीचा शिकारी समाज असला तरी पृथ्वीवरील जीव वनस्पतींचे त्यांनी रक्षण केले आहे.कोणताही जीव जन्माला आला पाहिजे असे त्यांना वाटते. प्रजनन काळात ते पक्षी शिकार करत नाहीत. पारधी मुलींचे शैक्षणिक पालकत्व आपण घेतले पाहिजे असे ते म्हणाले.

साक्षी साळुंखे म्हणाल्या की आपल्यापेक्षा शिक्षणात मागे राहिलेल्या समाजाला समजून घेण्याची आपल्याकडे संवेदनशीलता असायला हवी. पारधी वस्तीवर जाऊन आपलेपणाने मुलांना शिकवण्याची गरज आहे. मी स्वतः वस्ती शाळेवर शिकविते. त्यांची हळूहळू प्रगती होत असून ही मुले आता चांगले भाषण सुद्धा करीत आहेत असे त्या म्हणाल्या. अक्षरबंध संस्थेचे विशाल जाधव म्हणाले की कर्मवीरांनी शिक्षण देऊन आपल्याला घडविले आपण त्यांच्यासारखे काम करून वंचित घटकातील मुलाना शिकवावे. हेच खरे फुले शाहू आंबेडकर यांचे काम आहे. मी माझी नोकरी सांभाळून आस प्रकल्पातील मुलांच्यासाठी काम करीत असतो.

भाग्यवान घाडगे म्हणाले पारधी समाज आदिवासी समाज आहे. आजही तो गावकुसाबाहेर दूर राहतो. त्यांच्या मुलाना शिकविण्यासाठी मी दर आठवड्याला जात असतो आस प्रकल्प अंतर्गत सातारा व कोरेगाव तालुक्यात ८ आठवडी शाळा आम्ही चालवतो. क्षमता निर्माण ,व्यक्तिमत्व विकास,शारीरिक खेळ,तंत्रज्ञान उपयोग या गोष्टी आम्ही करतो. पालकांचे सहकार्य आता मिळत असल्याचे अनुभव त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक प्रा.डॉ. सुभाष वाघमारे यांनी केले. या कार्यशाळेत प्रश्नोत्तर कार्यक्रमात विनय कर्चे, गौरव भंडारे, धनश्री निंबाळकर, तेजस्वीनी, ओंकार खंडझोडे, डॉ.कांचन नलवडे, राधा वाघमारे, इत्यादीनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विद्या नावडकर यांनी केले. पारधी समाजातील मुलांसाठी यावेळी कॉलेजकडून परीक्षेसाठीचे पॅड भेट देण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी पारधीवस्तीवर जाऊन मुलांना शिकविणार असल्याचे यावेळी सांगितले.

# दिव्यांग कल्याणासाठी प्रयत्नशील : प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: सामाजिक जबाबदारीच्या भावनेतून दिव्यांगासाठी लायन्स क्लबकडून सुरु असलेले कार्य कौतुकास्पद आहे. दिव्यांगांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील आहे. दिव्यांगांसाठीच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचवल्या पाहिजेत. त्यांच्या कल्याणासाठी माझा कायम पुढाकार राहील, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. दिव्यांगांसाठी एकाच छताखाली सर्व गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी लायन्स क्लबने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



लायन्स क्लब इंटरनॅशनल ३२३४ डी-२ च्या वतीने आयोजित 'हाक दिव्यांगांची, साथ लायन्सची' उपक्रमाअंतर्गत २६ दिव्यांगांना व्हीलचेअरचे वाटप प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. एरंडवणे येथील सेवासदन शाळेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात माजी प्रांतपाल रमेश शहा, दीपक शहा, 'सेवासदन'चे सरचिटणीस चिंतामणी पटवर्धन, दिव्यांग विभाग प्रमुख सीमा दाबके, दीपक लोया, आनंद आंबेकर, सुरेश मेहता, राजीव निगडीकर, सुवर्णा दोषी, दिपीका खिवसरा, राजश्री शहा, राणी अहलुवालिया, सुहास दाबके, ज्योती भंडारी यांच्यासह लायन्स क्लबचे सभासद, दिव्यांग विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सचिन नहार यांच्याकडून एक व्हीलचेअर भेट देण्यात आली. दिव्यांगांसाठी लायन्स क्लबच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत असतो. अनेकांचे या उपक्रमात सहकार्य मिळत आहे. दिव्यांगांना दैनंदिन जीवन जगताना येणाऱ्या अडचणी सोडवण्याचे कार्य समाधान देऊन जाते, अशी कृतज्ञ भावना रमेश शहा यांनी व्यक्त केली.

दीपक शहा म्हणाले, दिव्यांगांना सर्व सोयींनी युक्त असे 'लायन्स मेडिकल भवन' उभारण्याचा आमचा मानस आहे. या मेडिकल भवनमध्ये दिव्यांगांसाठी सर्व प्रकारच्या वैद्यकीय सुविधा, शासकीय योजना, प्रशिक्षण केंद्र, कार्यशाळा उपलब्ध होणार असून, यासाठी लागणारी जागा मेधाताईंनी उपलब्ध करून द्यावी. रमेश शहा यांच्या संकल्पनेतून 'हाक दिव्यांगांची, साथ लायन्सची' या उपक्रमाला सुरुवात झाली. आज या उपक्रमाअंतर्गत २५ दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर देण्यात आल्याचे सीमा दाबके म्हणाल्या. सूत्रसंचालन मेघना जोशी यांनी केले. आभार ऋजुता पितळे यांनी मानले.

# लोकसभेचा निर्णय कार्यकर्त्यांशी चर्चा करुन घेणार: रामराजे निंबाळकर

माणदेश एक्सप्रेस न्यूज

सातारा: माढा लोकसभा मतदार संघातील तिढा सोडविण्याचा प्रयत्न भाजपकडून करण्यात आला आहे. यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही याबाबत तडजोड करण्याचा प्रयत्न केला. पण याबाबत दोन दिवसांनंतर समविचारी नेते आणि स्थानिक कार्यकर्त्यांशी चर्चा करुन निर्णय घेवू. तोपर्यंत या बैठकीबाबत कोणीही कोणत्याही अफवांना बळी पडू नये, असे विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे निंबाळकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. मोहिते पाटील यांच्याशिवाय झालेल्या या बैठकीनंतर श्रीकांत भारतीय यांनी कोणतीही अडचण नाही, सगळ ओके आहे, एव्हरीथिंग इज ओके असे सांगितले आहे.

मुंबई येथील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर मंगळवारी बैठक झाली. या बैठकीस आ. श्रीकांत भारतीय यांनी पुढाकार घेतला होता. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, रामराजे निंबाळकर, खा. रणजितसिंह निंबाळकर, आ. जयकुमार गोरे, सातारा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर, फलटणचे माजी नगरसेवक अनिकेतराजे निंबाळकर आदी उपस्थित होते. ही बैठक अगोदर खा. रणजितसिंह निंबाळकर यांच्या समवेत तर दुसऱ्यावेळी रामराजे निंबाळकर यांच्यासमवेत झाली होती.

या बैठकीनंतर माढा लोकसभेचा तिढा सुटला असे मेसेज वेगात फिरल्यानंतर रामराजे निंबाळकर यांनी आपल्या मोबाईलवर स्टेटस ठेवून दोन दिवसांनंतर कार्यकर्ते व समविचारी नेते यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल, तोपर्यत कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे सांगितले.

माढा लोकसभेसाठी भाजपकडून विद्यमान खासदार रणजितसिंह निंबाळकर यांना तिकीट जाहीर करण्यात आले आहे. मात्र अकलुजचे मोहिते पाटीलही प्रबळ इच्छुक होते. मात्र भाजपने त्यांना डावलत निंबाळकर याना उमेदवारी दिली. तर दुसरीकडे महायुतीमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे रामराजे निंबाळकर यांचे बंधू संजीवराजे निंबाळकर ही लोकसभेसाठी इच्छुक होते. दरम्यान, रणजितसिंह निंबाळकर यांची उमेदवारी नको असल्यामुळे त्यांचे काम न करण्याचा इशाराही यापूर्वी दिला होता. त्यानंतर अकलूजच्या शिवरत्न बंगल्यावर त्यांनी मोहिते पाटील यांच्याशी चर्चा केल्यामुळे माढ्याच्या उमेदवारीचा तिढा वाढला होता.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार यांच्या या बैठकीत झालेल्या चर्चेनंतर प्रसारमाध्यमे व सोशलमिडीयावर महायुतीचा धर्म पाळावा, अशी सूचना रामराजे निंबाळकर यांना करण्यात आल्याचा मेसेज फिरला. यानंतर रामराजे यांनी मी माझे स्थानिक कार्यकर्त्यांशी व माढा लोकसभा मतदार संघातील समविचारी नेते यांच्याशी चर्चा करुन दोन दिवसांनंतर निर्णय घेणार आहे. तोपर्यंत कोणीही अफवांवर विश्वास ठेवू नये, याबाबत स्वत: रामराजे निंबाळकर यांनी स्टेटस ठेवले आहे.

# भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव पदी डॉ. स्वाती पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

आष्टाः-संजीवन आरोग्य व शिक्षण समूहाच्या सचिव डॉ.स्वाती पाटील भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव पदाची जबाबदारी लीलायपणे पेलतील. पन्हाळा, शाहूवाडी तालूक्याला भाजपाला बळकटी मीळेल असे. गौरवोद्गार अशोका अग्रोचे संस्थापक उद्योजक डॉ. सतीश पाटील यांनी काढले. ते डॉ.स्वाती पाटील यांची भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव पदी निवड झालेबद्दल अशोका अग्रो पोखर्णीच्यावतीने आयोजित सत्कार प्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी डॉ.दीपक पाटील, पोखर्णीचे सरपंच विश्वनाथ जाधव, माजी सरपंच रेखाताई पाटील, राजारामबापू कारखान्याचे संचालक प्रतापराव पाटील, युवा उद्योजक प्रतीक पाटील, डॉ.स्मिता पाटील, माजी स्वातंत्र्य सैनिक आनंदराव पाटील, उत्तम पाटील व मान्यवर उपस्थित होते.

डॉ.सतीश पाटील म्हणाले, संजीवन आरोग्य व शिक्षण समूहाची स्थापना करून बोरपाडळे येथे हॉस्पिटलच्या माध्यमातून आरोग्यसेवा जोपासली. वैद्यकीय पदवी शिक्षण शिक्षण देण्यासाठी मेडिकल कॉलेज सुरू केले. पोखर्णी गावच्या डॉ.स्वाती पाटील यांना वडील स्व.अशोकराव पाटील काका यांच्या संस्कारांचे धडे मिळाले.

# गोकुळच्या प्रगती मध्ये दूध संस्था व संस्था कर्मचारी यांचे मोलाचे योगदान

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : गोकुळ दूध संघाशी संलग्न प्राथमिक दूध संस्था कर्मचारी संघटनेमार्फत जिल्ह्यातील १ एप्रिल २०२४ पासून गोकुळ सलंग्न प्राथमिक दूध संस्थांच्या व्यवस्थापन खर्चामध्ये प्रतिलिटर १० पैसे व संस्था कर्मचारी यांना प्रोत्साहन पर रक्कमेत प्रतिलिटर ५ पैसे (वार्षिक १० ते ११ कोटी रुपये) वाढीचा निर्णय संचालक मंडळाने घेतले बद्दल गोकुळचे चेअरमन अरुण डोंगळे व जेष्ठ संचालक विश्वास पाटील तसेच उपस्थित संचालक शशिकांत पाटील चुयेकर, बयाजी शेळके यांचा सत्कार संघटनेचे अध्यक्ष केरबा पाटील, शामराव पाटील, विश्वास पाटील यांच्या हस्ते व संघटनेचे सर्व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत संघाच्या ताराबाई पार्क, कार्यालय येथे करण्यात आला.



यावेळी संघाचे चेअरमन अरुण डोंगळे म्हणाले की, गोकुळ संलग्न प्राथमिक दूध संस्था व दूध संस्थेमध्ये काम करणारे कर्मचारी वर्ग यांचा गोकुळच्या प्रगती मध्ये मोलाचे योगदान आहे. हिरक महोत्सवी वर्षानिमित्त गोकुळ संबंधित सर्व घटकांना लाभ देण्याचा प्रयत्न केला आहे. भविष्यात संघाच्या विविध योजनांची माहिती दूध उत्पादकापर्यंत पोहोचवून संघाच्या दूध वाढीसाठी सर्वांनी प्रयत्नशील राहावे असे आवाहन गोकुळचे चेअरमन अरुण डोंगळे यांनी केले.

यावेळी संघटनेच्या वतीने दूध संस्था कर्मचारी प्रोत्साहन रकमेत प्रति लिटर पाच पैसे अजून वाढ करनें संबंधी तसेच कामकाजातील अडीअडचणी संदर्भात चर्चा करण्यात आली.गोकुळचे जेष्ठ संचालक विश्वास पाटील यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष केरबा पाटील यांनी केले. तर आभार संघटनेचे सेक्रेटरी विश्वास पाटील यांनी केले. यावेळी संघाचे चेअरमन अरुण डोंगळे, ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील, संचालक शशिकांत पाटील चुयेकर, बयाजी शेळके, संघटनेचे अध्यक्ष केरबा पाटील, उपाध्यक्ष शामराव पाटील, सेक्रेटरी विश्वास पाटील, सुरेश जाधव, तानाजी गुरव, सरदार देसाई, संजय पानारी, मंगेश बेडकळ,रामचंद्र चौगले, शिवाजी शिंदे, सूनिल विभूते,रमेश पाटील, संजय हाळदकर, आबासो पाटील, दिनकर कोतेकर, मोहन धुंदरे, शिवाजी गायकवाड व संघटनेचे कर्मचारी उपस्थित होते.

# खोतवाडी येथे गाथा पारायण सोहळ्यास उत्साहात सुरुवात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा :खोतवाडी ता.शिराळा येथे श्री.संत तुकाराम महाराज बिजोत्सवानिम्मित्त आयोजीत करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व गाथा पारायण सोहळ्यास उत्साहात व भक्तीमय वातावरणात सुरुवात करण्यात आली. प्रारंभी व्यासपीठ चालक म्हणुन ह भ प - एकनाथ महाराज (खोतवाडी) यांचे उपस्थीतीमध्ये विविध धार्मीक विधी झाले यामध्ये प्रामुख्याने विनापुजन ह.भ.प.दगडु खोत पारायण सोहळ्या नीम्मित्त गाथा वाचनात तल्लीन झालेले वाचक. यांचेहस्ते करण्यात आले, ग्रंथपुजन-ह.भ.प सोपान खोत महाराज तसेच टाळपुजन शंकरदादा मोहीते व विठ्ठल राणे यांचे हस्ते ध्वजपुजन करुन रामकृष्ण हरीच्या गजरात श्री.संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. दरम्यान सप्ताह कालावधीत काकड आरती, गाथावाचन, हरीपाठ,किर्तन असे दैनंदिन कार्यक्रम होणार आहेत. या पारायण सोहळ्यासाठी श्री.शंकरदादा मोहिते यांचे विशेष सहकार्य लाभत आहे. दरम्यान हा सोहळा यशस्वी होण्यासाठी शंकरदादा मोहीते,यशवंत खोत,आनंदा कंदारे,तुकाराम खोत,सोपान खोत यांचेसह खोतवाडी पारायण मंडळाचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# राज्यातील ७३ साखर कारखान्यांचे गाळप बंद! किती दिवस चालणार साखर कारखाने?

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: राज्यभरातील उसाचा गळीत हंगाम शेवटच्या टप्प्यावर येऊन ठेपला आहे. यंदाचा गळीत हंगाम फेब्रुवारीमध्ये संपेल अशा शक्यता असताना गळीत हंगाम लांबला आहे. तर राज्यातील अनेक साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले आहे. त्याचबरोबर साखर उत्पादनही समाधानकारक झाले असून मागच्या वर्षीच्या तुलनेत खूप जास्त फरक जाणवणार नाही. दरम्यान, जून ते सप्टेंबरच्या दरम्यान पाऊस सरासरीच्या तुलनेत कमी झाला असला तरी नोव्हेंबर अखेरीस पडलेल्या पावसामुळे राज्यातील उस शेतीला फायदा झाला. त्यामुळे उसाचे उत्पादन वाढले आणि गळीत हंगाम लांबला आहे. तर साखरेचे उत्पादनही तुलनेने वाढले आहे. सध्या राज्यभरात १ हजार १२ लाख टन उसाचे गाळप झाले तर १ हजार २८ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे.



राज्यातील १८ मार्चअखेरपर्यंतच्या अहवालानुसार राज्यातील ७३ साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले आहे. हे कारखाने कमी पाण्याच्या प्रदेशातील असून पाण्याची उपलब्धता असणाऱ्या कारखान्यांचे गाळप शेवटच्या टप्प्यात आहे. मार्चच्या शेवटच्या आठवड्यामध्ये राज्यातील बहुतांश साखर कारखाने उसाच्या उपलब्धतेमुळे गाळप थांबवतील अशी शक्यता आहे.

सध्या अनेक साखर कारखान्यांनी आपले गाळप बंद केले असून मार्च अखेरपर्यंत राज्यातील बहुतांश म्हणजे ९० टक्के कारखाने आपले गाळप बंद करतील अशी शक्यता आहे. तर त्यानंतर काही कारखाने एप्रिलच्या मध्यापर्यंत चालतील अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. यंदा साखरेचे उत्पादन कमी होण्याची शक्यता असतानासुद्धा साखरेचे उत्पादन वाढले आहे. इथेनॉल निर्मितीवर बंधने घातल्यामुळे साखरेचे उत्पादन वाढल्याचं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

# गुंड लल्लन जाधव आणि टोळीकडून प्रतापसिंह नगरमध्ये तोडफोड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

साताराः सातारा शहरालगतच्या प्रतापसिंह या उपनगरामध्ये गुंड लल्लन जाधव आणि त्याच्या टोळक्याने नगर परिसरात तलवार नाचवत सुमारे वीस ते तीस वाहनांची तोडफोड केली जुन्या भांडणाच्या कारणावरून एका कुटुंबातील अल्पवयीन मुलीवर तलवारीने वार करून त्या कुटुंबीयांना धमकावल्याचा प्रकार समोर आला आहे या प्रकरणांमध्ये एकूण बारा जणांवर गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून याप्रकरणी सात जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे सातारा शहर पोलिसांनी या घटनेच्या पार्श्वभूमीवर कोंबिंग ऑपरेशन करून परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आहे



याप्रकरणी प्रताप श्रीनगर येथील अल्पवयीन मुलीची फिर्याद नोंदवली गेली आहे लोकसभा निवडणुकांची आचारसंहिता सुरू असताना लल्लन आणि त्याच्या फळकुट टोळीने उच्छाद घातल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या आदेशाने सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र मस्के आणि त्यांच्या पथकाने परिसरात चोख बंदोबस्त ठेवला आहे अजय उर्फ लल्लन जाधव सागर खोडे राजू उर्फ बंटी लोमटे सुनील वाघमारे विजय उर्फ बबल्या जाधव दत्ता उर्फ गजऱ्या आसावरी ऋतिक उकिरडे विकास रमेश खुडे ओंकार देढे सुनील दत्ता जाधव मधुरमा दत्ता जाधव अम्मी बोराटे मच्छिंद्र उर्फ टाकल्या बोराटे जय कांबळे किरण उकिरडे यांच्यावर सातारा शहर पोलीस ठाण्यात कोणाची नोंद करण्यात आली आहे याबाबतची अधिक माहिती अशी लल्लन जाधव आणि त्याच्या टोळक्याने रात्री नऊच्या दरम्यान फिर्यादी कुटुंबीयांच्या घरी जाऊन तुम्हाला इथे राहायचे असेल तर नीट राहा अन्यथा तुम्हाला बघून घेईल अशी धमकी दिली होती या प्रकारामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले संबंधित फिर्यादी कुटुंबाने भीतीपोटी याची वाचता केली नाही रात्री अडीचच्या दरम्यान ललन जाधव आणि त्याच्या साथीदारांनी फिर्यादीच्या घरात घुसून शिवीगाळ व दमदाटी केली लल्लन जाधव यांनी अल्पवयीन मुलीच्या अंगाशी झटापट केली तसेच त्यांच्या घराचा दरवाजा दगडाने फोडण्यात आला तसेच फिर्यादी युवतीच्या आईच्या गळ्यातले मंगळसूत्र ओढले रागाच्या भरात लल्लन यांनी अल्पवयीन मुलीच्या पोटावर तलवारीने वार केला तसेच घरातील साहित्य अस्ताव्यस्त केले त्यानंतर मी प्रतापसिंह नगराचा दादा आहे तुम्हाला जिवंत ठेवणार नाही असे म्हणत त्यांनी हातातले तलवार व कोयते नाचवले व परिसरातील रिक्षा एक मारुती कार तसेच इतर चार पाच वाहनांची तोडफोड केली या रात्रीच्या प्रकारामुळे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते या प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या आदेशाने शीघ्र प्रतिसाद दल तात्काळ तेथे प्राचारण करण्यात आले सातारा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आणि ५० कर्मचाऱ्यांनी पहाटे अडीच ते सकाळी सहा या दरम्यान तातडीने कोंबिंग ऑपरेशन करून याप्रकरणी सात जणांना ताब्यात घेतले आहे संबंधित युवतीची तलवारीच्या वार झाल्यामुळे प्रकृती गंभीर असून तिच्यावर सातारा जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत प्रतापसिंह नगर मध्ये सातारा शहर पोलिसांनी पोलीस बंदोबस्त ठेवला आहे या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी कायदा सुव्यवस्था अशी करणार नाही याची दक्षता घेत सातारा शहर परिसरात जादा बंदोबस्त तैनात केला आहे फरार झालेल्या लल्लन जाधव आणि त्याच्या इतर साथीदारांचा शोध घेतला जात आहे.

# ऋतुराज गायकवाड सीएसकेचा नाव कर्णधार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

नवी दिल्ली : इंडियन प्रीमियर लीगचा हंगाम २२ मार्चपासून सुरू होत असतानाच आता चेन्नई सुपर किंग्सने एक मोठी घोषणा करत महेंद्रसिंग धोनीच्या जागी ऋतुराज गायकवाडकडे कर्णधार पद सोपवले आहे.

आयपीएलच्या १७ व्या हंगामाची सुरुवात गतविजेत्या चेन्नई सुपर किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगलोर यांच्यातील सामन्याने होणार आहे. याआधी सीएसकेने संघ नेतृत्वात बदल केला. फ्रँचायझीने युवा सलामीवीर ऋतुराज गायकवाडवर विश्वास दाखवत त्याच्याकडे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवली आहे.



ऋतुराज गायकवाड

## ऋतुराजची 'किंमत' धोनीच्या निम्मी

सीएसकेने २०१९ च्या लिलावात ऋतुराज गायकवाडला २० लाख रुपयांना विकत घेतले होते. पण त्याला २०१९ च्या हंगामातून आयपीएलमध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली नाही. पुढच्या वर्षीच्या हंगामात म्हणजे २०२० मध्ये, एमएस धोनीने त्याला संधी दिली. गायकवाडने आयपीएल २०२१ मध्ये ६३५ धावांसह ऑरेंज कॅपही जिंकली होती. त्याने आतापर्यंत आयपीएलमध्ये ५२ सामन्यांत ३९.०७ च्या सरासरीने १७९७ धावा केल्या आहेत. चेन्नई फ्रँचायझी गायकवाडला एका हंगामासाठी ६ कोटी रुपये देत आहे. तर धोनीला १२ कोटी रुपये मिळत आहेत. अशाप्रकारे गायकवाडची आयपीएलमधील फी धोनीपेक्षा निम्मी आहे.

## ऋतुराज सीएसकेचा चौथा कर्णधार

२७ वर्षीय गायकवाड सीएसकेचा चौथा कर्णधार असेल. धोनीशिवाय याआधी रवींद्र जडेजा आणि सुरेश रैना यांनी कर्णधारपद भूषवले आहे. धोनीने २२६ सामन्यात चेन्नई संघाचे नेतृत्व केले आहे. जडेजाने ८ तर रैनाने ५ सामन्यात नेतृत्व केले आहे. आयपीएल २०२२ मध्येही सीएसकेने आयपीएल सुरू होण्याच्या एक दिवस आधी नवीन कर्णधाराची घोषणा केली होती. त्यावेळी रवींद्र जडेजाची कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली होती. पण त्या हंगामात जड्डूच्या नेतृत्वाखाली चेन्नई संघाची कामगिरी खराब झाली. त्यानंतर जडेजाला हटवून धोनीकडे पुन्हा कर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली होती.

## धोनी यशस्वी कर्णधारांमध्ये अव्वल!

धोनीने २००८ च्या पहिल्या आयपीएल हंगामापासून सीएसकेचा कर्णधार राहिला. या लीगमधील सर्वात यशस्वी कर्णधारांमध्ये तो अव्वल स्थानी आहे. त्याने २२६ सामन्यांमध्ये आपल्या फ्रेंचायझीचे नेतृत्व केले आहे. यातील १३३ सामने जिंकले आहेत तर ९१ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. २ सामन्यांचा निकाल लागला नाही. धोनीच्या नेतृत्वाखाली संघाची विजयाची टक्केवारी ५८.८४ इतकी आहे.

# उन्हाचा कडाका:विदर्भात पावसाचा अंदाज!

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : पुण्यातील कमाल तापमानात वाढ होत असून, दुपारी उन्हाचा चटका चांगलाच जाणवत आहे. तसेच राज्यातील मराठवाडा आणि विदर्भामधील अनेक ठिकाणी किमान व कमाल तापमानात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. विदर्भात पावसाचा अंदाज असल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे. पुढील दोन दिवसांत किमान व कमाल तापमानात १ ते २ डिग्री सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

आज राज्यामध्ये ढगाळ हवामान असून, तापमानात वाढ झाल्याने उन्हाचा चटका, उकाडा जाणवत आहे. काही दिवस पावसाने हजेरी लावल्यामुळे विदर्भ, मराठवाड्यात सकाळी गारवा जाणवत होता. पुणे शहरातही सकाळी व रात्री गारवा होता. पण आता पुण्यातही उष्णता वाढू लागली आहे. राज्यामधील अनेक ठिकाणी कमाल तापमान ३७-३८ अंश सेल्सिअसवर पोचले आहे. विदर्भात बुधवारी वाशिमल ३८ तर सोलापूर ३९ अंश सेल्सिवर पोचले होते.

दरम्यान, पश्चिम विदर्भ आणि परिसरावरील चक्राकार वाऱ्यांची स्थिती उत्तर तेलंगणावर सक्रिय आहे. या चक्राकार वाऱ्यांपासून दक्षिण केरळपर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा तयार झालेला आहे. मध्य प्रदेशापासून दक्षिण आसामपर्यंत हवेचा कमी दाब पट्टा कायम आहे.

पुणे शहरात आज शिवाजीनगरचे कमाल तापमान ३५.८ नोंदवले गेले असून, किमान तापमान १४.२ नोंदले आहे. सकाळपासूनच उष्णतेचा चटका पुणेकरांना जाणवू लागला आहे. हवेली, एनडीए याभागात मात्र किमान तापमान १३.६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले. त्यामुळे सकाळी या ठिकाणी गारवा जाणवत आहे. दुसरीकडे वडगावशेरी, मगरपट्टा, हडपसर, कोरेगाव पार्कचे किमान तापमान २० व २४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदवले जात आहे.

# मतदान जनजागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : येत्या सात मे रोजी लोकशाहीचा उत्सव पार पडत आहे. या उत्सवामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे यासाठी स्वीप मोहिमेअंतर्गत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. त्या प्रयत्नाचे फलित म्हणून जिल्ह्यात ठिकठिकाणी वेगवेगळ्या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेचा उद्देश मतदानाची टक्केवारी वाढावी असा असून या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसह सांगली शहरामध्ये, दि. २७ मार्च रोजी सकाळी ७ वाजता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

या रॅलीला विश्राम बाग येथून प्रारंभ होणार असून कर्मवीर भाऊराव पाटील चौक, राममंदीर या ठिकाणा वरून मार्गक्रमण करत भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम येथे या रॅलीची सांगता होणार आहे. या रॅलीला प्रशासनातील सर्व प्रमुख अधिकारी उपस्थित राहणार आहेत. १८ वर्षापुढील सर्वांनी या सायकल रॅलीत सहभागी व्हावे, असे आवाहन स्वीपचे नोडल अधिकारी शशिकांत शिंदे यांनी केले आहे.

# चोरीच्या विविध गुन्ह्यातील ५०:लाखांचा मुद्देमाल फिर्यादींना सुपूर्त

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सांगली सह जिल्ह्यातील घडलेल्या विविध गुन्ह्यातील आरोपींना जेरबंद करून त्यांच्याकडून जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादींना आज विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. पोलीस मुख्यालयातील कॉन्फरन्स हॉल येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी सुनील फुलारी म्हणाले की, सांगली जिल्हा पोलीस दलातील तापसी अंमलदारांनी उत्कृष्ठ तपास करत मुद्देमाल जप्त केला आहे. एकूण पाच गुन्ह्यात सोन्याचांदीचे दागिने, रोकडसह ५० लाखांचा मुद्देमालाचा समावेश आहे. सदरचा मुद्देमाल हा फिर्यादींना न्यायालयाच्या आदेशानुसार आज सुपूर्त केला आहे. पोलीस दलातील यशस्वी तापसी अधिकारी, अंमलदार यांनी गुन्ह्याची निर्गती करण्यास मदत केली आहे. त्यांचाही प्रशस्ती पत्र देऊन सन्मान केला आहे. यामध्ये महिला अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रियांका बाबर यांनी केलेल्या तपासामध्ये दोन वेगवेगळ्या गुन्हयात आरोपींना शिक्षा लागली आहे. त्यांचाही सन्मान करत रोख बक्षीस जाहीर करण्यात आल्याचे फुलारी यांनी सांगितले. यावेळी चोरीला गेलेला मुद्देमाल परत मिळाल्याने फिर्यादी यांनी पोलीस दलाचे कौतुक करत आभार मानले लाखो रुपयांचे दागिने परत मिळाल्याने महिलांच्या चेहऱ्यावरील आनंद द्विगुणीत झाला होता.

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पुढे ढकलल्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २८ एप्रिल, २०२४ रोजी होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४, १९ मे, २०२४ रोजी होणारी समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या सरळसेवा चाळणी परीक्षा पुढे ढकलण्यात आलेल्या आहेत. या परीक्षांच्या सुधारित तारखा यथावकाश जाहीर करण्यात येतील. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता अधिनियम, २०२४ मधील आरक्षणाच्या तरतुदी विचारात घेता, शासनाकडून सुधारित आरक्षण निश्चिती प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त नमूद परीक्षांच्या बाबतीतील पुढील घोषणा आयोगातर्फे करण्यात येणार असल्याचे आयोगामार्फत कळविण्यात आले आहे.

# येणारा काळ महिलांचाच : सौ. प्रतिभा पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

इस्लामपूर : येथील अपंग शिक्षण मंडळ संचलित डॉ.व्ही.एस.नेर्लेकर मूकबधिर विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात संपन्न झाला महिला दिनानिमित्त विद्यालयातील संस्था महिला पदाधिकारी ,शिक्षिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी वर्गांचा सत्कार समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ.प्रतिभाताई पाटील राष्ट्रवादी महिला जिल्हा पदाधिकारी त्या बोलत होत्या.

संस्थेच्या संचालिका व वसतिगृह अधीक्षिका सौ.सुरेखा पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.महिला पदाधिकारी, शिक्षिका व महिला शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मानपत्र व गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या सौ.प्रतिभाताई पाटील म्हणाल्या की आधुनिक कालखंडामध्ये जर स्त्रियांच्या कतृत्वाकडे पाहिले तर स्त्रियांच्या विकासाचा आलेख हा वाढत चाललेला पाहावयास मिळतो. आपल्या देशामध्ये पंतप्रधान, राष्ट्रपती, सभापती भूषविणाऱ्या महिला होत्या. आज स्त्रियांच्या



कर्तृत्वाचा आलेख सर्व क्षेत्रामध्ये आपणास पाहायला मिळतो. ज्या सावित्रीबाई फुले, फातिमा शेख यांनी स्त्री शिक्षणासाठी आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले व महापुरुषांच्या प्रेरणेतून शिक्षणाची गंगा लोकांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. याचीच फलश्रुती आपणास आज स्त्रियांच्या कर्तृत्वातून पाहावयास मिळते.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. आनंदराव खडके सहसचिव श्री अभिमन्यू पाटील श्री उत्तम पांडुरंग जांभळे मुख्याध्यापक जि.प.शाळा आबाईचीवाडी यांनी हि मनोगत व्यक्त केले व महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. स्वागत व प्रस्ताविक संस्थेचे सहसचिव श्री.अभिमन्यू पाटील यांनी केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कलाशिक्षक श्री विजयकुमार पाटील यांनी केले.

# सुट्टीच्या दिवशीही मुद्रांक कार्यालय सुरू राहणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : नोंदणी व मुद्रांक शुल्क विभागाकडून दरवर्षी एक एप्रिलला वार्षिक मूल्य दरानुसार नवीन दर जाहीर केले जातात. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन दिनांक २३ व २४ मार्च तसेच २९ ते ३१ मार्च या शासकीय सुट्टीच्या दिवशी मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंध कार्यालये या दिवशी सुरू राहणार असल्याची माहिती सहाय्यक जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे - जिरंगे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. पक्षकारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात आज प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : खाजगी क्षेत्रात लहान मध्यम व मोठे उद्योजक तसेच कारखाने यांना आवश्यक असणारे मनुष्यबळ व बेरोजगारीची समस्या दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र सांगलीच्या वतीने आज दि. २२ मार्च रोजी जिल्हास्तरीय प्लेसमेंट ड्राईव्ह-९ चे आयोजन सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत करण्यात आले आहे.

या ड्राइव्हमध्ये तीन नामवंत कंपन्यांचा सहभाग असून एकूण १०६ पदे भरण्यात येणार असून इच्छूक व पात्र उमेदवारांनी विभागाच्या https://rojgar.mahaswayam. gov.in या वेबपोर्टलवर नोंदणी करून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी सकाळी १० ते २ या वेळेत मध्यवर्ती प्रशासकीय इमारत (तळमजला) जिल्हाधिकारी कार्यालय परिसर विजयनगर - सांगली या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त जमीर करीम यांनी केले आहे.

# जिल्हा प्रशासनाने १४,६३३ जाहिराती हटविल्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ जाहीर झाल्याने आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीला प्रारंभ झाला आहे. त्या अनुषंगाने निवडणूक जाहीर झाल्यापासून २४ तासाच्या आत शासकीय इमारती अथवा कार्यालयाच्या भिंतीवरील लेखन, पोस्टर, पेपर, कटआउट, होर्डिंग्ज, जाहिरातींचे फलक, बॅनर्स प्रशासनाने हटवली असून याची संख्या सुमारे ५ हजार ५९ इतकी आहे. तसेच ४८ तासांमध्ये सार्वजनिक मालमत्ता व जागेच्या गैरवापर दूर करण्याच्या अनुषंगाने प्रशासनाने ६ हजार ४०१ जाहिराती काढल्या. तर ७२ तासांमध्ये खाजगी मालमत्तेवरील सुमारे ३ हजार १७३ इतक्या जाहिराती आत्तापर्यंत काढून टाकण्यात आल्या. आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणाने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने एकंदरीत सुमारे १४ हजार ६३३ इतक्या जाहिराती काढून टाकल्या आहेत.

# पुढील संघर्षात शाहू छत्रपतींनी आम्हाला सोबत करावी, उद्धव ठाकरेंची अपेक्षा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : महाराष्ट्राच्या राजकारणात आम्ही जो संघर्ष करतो आहोत या संघर्षात शाहू छत्रपती महाराज यांनी पुढील काळात आम्हाला सोबत करावी, असे आवाहन शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी कोल्हापुरातील न्यू पॅलेस येथे झालेल्या चर्चेवेळी केले. ठाकरे यांनी शाहू छत्रपतींची गळाभेट घेऊन त्यांचे आशिर्वाद घेतले.

उद्धव ठाकरे हे तेजस ठाकरे, खासदार संजय राऊत, मिलिंद नार्वेकर यांच्या समवेत न्यू पॅलेस येथे शाहू छत्रपती महाराज यांची गुरुवारी दुपारी पावणेचार वाजता भेट घेऊन चर्चा केली. ही भेट चाळीस मिनिटांची होती. चर्चेदरम्यान ठाकरे यांनी शाहू छत्रपतींना पुढील संघर्षात आपली सोबत करावी. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी आपली गरज भासेल तेथे प्रचाराला यावे, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे विचार सांगावेत, आम्हाला मार्गदर्शन करावे, असे



आवाहन केले.

या भेटीवेळी ठाकरे यांनी कोल्हापूर लोकसभा मतदार संघातील सध्याची परिस्थिती जाणून घेतली. राज्यातील राजकीय परिस्थितीवर ठाकरे यांनी शाहू छत्रपतीं यांना माहिती दिली. चर्चेवेळी आमदार वैभव नाईक, माजी आमदार संजयबाबा घाटगे, अंबरिश घाटगे, सुरेश साळोखे, सुजित मिणचेकर, मालोजीराजे छत्रपती, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष व्ही. बी. पाटील, मधुरिमाराजे छत्रपती, संजय पवार, विजय देवणे, रविकिरण इंगवले, सुनील मोदी उपस्थित होते. न्यू पॅलेस परिसरात कॉंग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चर्चेनंतर पत्रकारांशी बोलताना उद्धव ठाकरे यांनी सांगितले की, शाहू महाराजांना महाविकास आघाडीची उमेदवारी जाहीर झाली आहे. शिवसैनिक पूर्ण ताकदीने महाराजांना विजयी केल्याशिवाय राहणार नाही. कारण हा महाराष्ट्राच्या तसेच मराठी अस्मितेचा प्रश्न आहे. मी महाराजांना वचन दिले आहे, त्यांच्या प्रचाराला तर येऊच शिवाय विजयाच्या सभेलाही नक्की येणार आहे.

# सुटीच्या दिवशीही होणार मालमत्ता कराची वसुली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई: मालमत्ता कराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी पालिकेने जोरदार मोहीम उघडली असून साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशीही महानगरपालिकेच्या सर्व २४ प्रशासकीय विभागांमध्ये मालमत्ता कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. करसंकलन खात्याचे नागरी सुविधा केंद्र सुरूही राहणार आहे. गुरुवारी टॉप टेन थकबाकीदारांची आणखी एक यादी जाहीर करण्यात आली. ३१ मार्च २०२४ हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस असल्यामुळे त्यापूर्वी आपल्या मालमत्तेसंबंधीचे कर भरण्यासाठी नागरिकही मोठ्या प्रमाणात संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये येत आहेत.

मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये २३ आणि २४ मार्च रोजी साप्ताहिक सुटी आहे. तर, २५ मार्च रोजी धुलिवंदन आणि २९ मार्च रोजी गुड फ्रायडेनिमित्त सार्वजनिक सुटी आहे. त्यावेळी, मालमत्ता करभरणा करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना या कालावधीत कर भरताना कोणतीही गैरसोय होऊ नये आणि निर्धारित वेळेत त्यांचा करभरणा व्हावा, यासाठी मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील साप्ताहिक आणि सार्वजनिक सुटीच्या दिवशीही करभरणा केंद्र सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. २० मार्च रोजी जाहीर करण्यात आलेले 'टॉप टेन' मालमत्ता करधारक १) न्यू लूक कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि (एफ उत्तर विभाग)-१४ कोटी ४८ लाख ८९ हजार २४१ रुपये २) श्री.साई ग्रुप ऑफ कंपनीज (के पश्चिम विभाग) - १४ कोटी ०७ लाख ९४ हजार ९८३ रुपये ३) कल्पतरू रिटेल व्हेंचर्स प्रा. लि. (एच पूर्व विभाग)- १० कोटी ७० लाख ७२ हजार १६२ रुपये ४) एव्हीएएलपी (आर मध्य विभाग)- १० कोटी ३८ लाख ७१ हजार ६६८ रुपये ५) न्यू लूक कन्स्ट्रक्शन्स प्रा. लि (एफ उत्तर विभाग) - ०८ कोटी ९२ लाख ४४ हजार ६३१ रुपये ६) पीआरएल अगस्त्य प्रा. लि. (एल विभाग)- ०७ कोटी ४२ लाख ९५ हजार ८९४ रुपये ७) चंपकलाल के वर्धन आणि कंपनी- (जी उत्तर विभाग)- ०४ कोटी ९४ लाख ९१ हजार ०७० रुपये ८) केबल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया- (आर मध्य विभाग) ०३ कोटी ५४ लाख ७० हजार २५३ रुपये ९) द टिंबर मार्केट (ई विभाग)- ०१ कोटी ५४ लाख १० हजार ४३८ रुपये १०) सुप्रीम सुखधाम (एच पश्चिम विभाग)- ०१ कोटी २२ लाख २४ हजार ३५२ रुपये.

# पोल्ट्रीची भिंत कोसळून दोन शाळकरी मुले मृत्यूमुखी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

लोणी काळभोर (पुणे) : कदमवाकवस्ती परिसरातील पांडवदंड येथे पोल्ट्रीची भिंत कोसळून झालेल्या अपघातात दोन शाळकरी मुले मृत्यूमुखी पडली तर दोन जण जखमी झाल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी (दि.२१) घडली. या अपघातात यश मयूर काळभोर, (वय- १४, रा. पांडवदंड रोड, कदमवाकवस्ती, ता. हवेली) व प्रथमेश संदीप बोरुडे (मयूर वय- १५ रा. सदर मूळ रा.देवकर वस्ती वार्ड नंबर ७, श्रीरामपूर, अहमदनगर) अशी मृत्यू झालेल्या दोन अल्पवयीन शाळकरी मुलांची नावे आहेत. तर भिंत पडत असल्याची जाणीव होताच भिंतीजवळ उभे असलेले यशचे वडील मयूर गजानन काळभोर व त्यांचा मित्र सुनील वसंत चव्हाण हे दोघेजण वेळीच बाजूला झाल्याने त्यांचे प्राण वाचले.

ही दुर्दैवी घटना दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली. स्थानिक नागरिंकाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयूर काळभोर यांची पांडवदंड परिसरात जुनी पोल्ट्री होती. ही पोल्ट्री साफ करण्याचे काम मागील दोन दिवसांपासून सुरु होते. दोन दिवसांपूर्वी मयुर काळभोर यांनी पोल्ट्रीवरील पत्रे काढून ठेवले होते. तर गुरुवारी सकाळपासूनच मयूर काळभोर, सुनिल चव्हाण या दोघांसह यश व प्रथमेश हे चारजण पोल्ट्रीमधील साहित्य व जागेची साफसफाई करत होते. ही साफसफाई सुरु असतानाच दुपारी एक वाजण्याच्या सुमारास अचानक भिंत कोसळल्याने या भिंतीच्या बाजूला उभे असलेले यश काळभोर व प्रथमेश बोरुडे हे त्या भिंतीखाली गाडले गेले. तर भिंत पडत असल्याचे लक्षाच आल्याने व लागलीच बाजूला झाल्याने मयूर काळभोर आणि सुनील चव्हाण हे

दोघेजण भिंतीखाली जाण्यापासून वाचले. दरम्यान भिंतीखाली दोन मुले अडकल्याचे लक्षात येताच, मयूर काळभोर व त्या ठिकाणी असलेल्या नागरिकांनी तात्काळ भिंत हटविण्याचे काम सुरु केले. भिंतीखाली गाडल्या गेलेल्या वरील दोन्ही मुलांना तत्काळ लोणी काळभोर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच दोघांचेही निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान या दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेला यश काळभोर हा कदमवाकवस्ती येथील रायलकर हॉस्पीटल शेजारी असलेल्या टायग्रीस स्कूल या शाळेत इयत्ता आठवीच्या वर्गात शिकत होता. तर त्याचा मित्र प्रथमेश बोरुडे हा लोणी काळभोर येथील पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कूलमध्ये नववीच्या वर्गात शिकत होता. दोन्ही शाळकरी मुलांचा मृत्यू, तोही बापाच्या डोळ्यादेखत झाल्याने लोणी काळभोर व परिसरात शोककळा पसरली आहे.